# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे**
**दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१**
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-३५** **दिनांक - ०५/०२/२०२४**

## सोन साखळी चोरास जेरबंद करण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत येणा-या विरार, अर्नाळा, नालासोपारा परिसरात गेल्या काही महिण्यांपासुन रस्त्यावरुन वाहन चालवणा-या महीलांची, मोटारसायकलस्वार अज्ञात आरोपीत व्दारे मंगळसुत्र, सोन्याची चैन जबरीने खेचुन चेन स्नॅचींग प्रमाण वाढल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने दि.२५/०१/२०२४ रोजी रात्रौ २२.०० वाजेच्या सुमारस फिर्यादी हया त्यांचे ॲक्टीव्हा स्कुटरने घरी जात असताना जुने विवा कॉलेजजवळ रिलायन्स मार्ट येथे अज्ञात आरोपीत यांने फिर्यादी याचे पाठीमागुन स्पोर्ट मोटारसायकल वरुन येवुन फिर्यादी यांचे गळयातील ९५,०००/- रु. किं.चे १७.४३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जु.वा.कि.सु. हे जबरीने खेचुन जकात नाका विरार प. बाजुकडे पळुन गेला म्हणुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५१/२०२४ भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे अनोळखी इसमा विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेणे करीता मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे सदर गुन्हा उघडकीस आणणे करीता उक्त गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३ कडे देण्यात आला. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष -३ चे वेगवेगळे पोलीस पथक तयार करुन आयुक्तालय परिसरात घडणारे चैन स्नॅचिंगचे विविध गुन्हयाचे अवलोकन करुन आरोपीत याने गुन्हयात वापरलेले वाहन तसेच आरोपीत याची गुन्हे करण्याची पध्दती वरुन गुप्त बातमीदार याचे मार्फतीने आरोपीत याची माहीती मिळवुन आरोपीत नामे - अमित नथु शनवार वय २८ वर्षे रा. तलासरी, ता. डहाणु, जि. पालघर यास गुन्हयात वापरलेली मोटारसायकल व हेल्मेट सह ताब्यात घेवुन त्याचे कडे कौशल्यपुर्वक तपास करता पोलीस कोठडी दरम्यान एक सोन्याची चैन व सोन्याची लगड असा ७३.५०० ग्रॅम वजनाचा ४,३८,२००/- रुपये किंमतीच्या मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन उक्त आरोपीत याचे कडे पोलीस कोठडी दरम्यान तपास करता खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे | ५१/२०२४ | भा.द.वि.स. कलम ३९२ प्रमाणे |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | २१/२०२४ | भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |
| ३ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ३९४/२०२३ | भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |
| ४ | नालासोपारा पोलीस ठाणे | ४१/२०२४ | भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |

आरोपीत यास दिनांक ०५/०२/२०२४ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर असुन गुन्हयाचा अधिक तपास गुन्हे शाखा कक्ष -३ विरार हे करीत आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त साो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त साो (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण,सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/ प्रविण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण नेम - सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

